**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत - ओमान व्यापार शिखर परिषद दोन्ही देशांच्या भागीदारीला एक नवी दिशा आणि गती देईल, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- व्हीबी जीरामजी विधेयक लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर; विधेयकाच्या प्रती फाडून तसंच घोषणाबाजी करत विरोधकांकडून निषेध व्यक्त

- काँग्रेस नेत्या आणि विधान परिषद सदस्य प्रज्ञा सातव यांचा भाजपात प्रवेश

- नाशिक इथल्या तपोवनातल्या वृक्षतोडीला येत्या १४ जानेवारीपर्यंत मुंबई उच्च न्यायालयाची स्थगिती

**आणि**

- आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं निधन

**<><><><><>**

भारत - ओमान व्यापार शिखर परिषद दोन्ही देशांच्या भागीदारीला एक नवी दिशा आणि गती देईल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज ओमानची राजधानी मस्कत इथं शिखर परिषदेला संबोधित करत होते. ओमान आणि भारत प्राचीन काळापासून एकमेकांसोबत व्यापार करत आहेत, अरबी समुद्र दोन्ही देशांना जोडणारा पूल म्हणून काम करतो असं ते प्रधानमंत्री म्हणाले. दोन्ही देशातील आर्थिक भागीदारीमुळे व्यापाराला नवी गती मिळेल, गुंतवणुकीदारांच्या मनात विश्वास निर्माण होईल आणि , प्रत्येक क्षेत्रात संधीची नवी दारं उघडली जातील असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.
भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वेगाने जात आहे, याचा फायदा ओमानलाही होणार आहे असं सांगत प्रधानमंत्र्यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख केला.

**होल्ड बाईट मोदी**

त्यानंतर प्रधानमंत्री मोदी ओमानचे सुलतान आणि राष्ट्रप्रमुख हैथम बिन तारिक यांची त्यांच्या राजवाड्यात भेट घेतील. दोन्ही देश आज ऐतिहासिक व्यापक आर्थिक

भागीदारी करारावर स्वाक्षरी करणार आहेत. उभय नेत्यांच्या उपस्थितीत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस अल युसूफ करारावर स्वाक्षरी करतील.

**प्रधानमंत्री** मोदी यांनी आज मस्कतमधे भारतीय समुदाय आणि विद्यार्थ्यांना संबोधित केलं. भारतातील वैविध्यता ही त्याच्या संस्कृतीचा आधार असून प्रत्येक दिवस भारतीयांच्या जीवनात नवा रंग घेऊन येतो, प्रत्येक ऋतु नवा उत्सव असतो आणि प्रत्येक पंरपरा एक नवी कल्पना असते असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान अर्थात व्ही बी जी-राम जी विधेयक २०२५ आज लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर झालं. हे विधेयक २० वर्षांपासून चालत आलेल्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ अर्थात 'मनरेगा'ची जागा घेईल. मनरेगात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी दिली आहे. या विधेयकात सव्वाशे दिवसांच्या कामाची हमी प्रस्तावित आहे. पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर ६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना दिला आहे. यादरम्यान काम थांबवलं जाईल, जेणेकरून शेतीतल्या कामांना मजुरांची कमतरता भासणार नाही. पूर्वी या योजनेचा संपूर्ण निधी केंद्र सरकार द्यायचं. आता मोठ्या राज्यात ६० टक्के निधी केंद्राचा आणि उर्वरित ४० टक्के वाटा हा राज्यांचा असेल. ईशान्येकडची आणि हिमालयातल्या राज्यांमध्ये केंद्राचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत वाढेल.

**दरम्यान,** चौहान यांच्या भाषणावेळी विरोधकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली आणि विधेयकाच्या प्रती फाडल्या. विधेयक मंजूर झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. उद्या हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

**<><><><>**

त्याआधी व्हीबी- जी राम जी हे विधेयक मागे घ्यावं, या मागणीसाठी आज विरोधी पक्ष सदस्यांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. मनरेगाचे फलक हातात घेऊन विरोधकांनी महात्मा गांधींच्या पुतळ्यापासून ते मकरद्वारापर्यंत घोषणाबाजी करत मोर्चाही काढला. केंद्र सरकारने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा अपमान केला असून भारताच्या

ग्रामीण भागात सामाजिक आर्थिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या योजनेवरही गदा आणली आहे, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत आज तीन नक्षली मारले गेले. गोलापल्ली पोलीस ठाणे परिसरात आज सकाळी सुरक्षा दलाचे जवान आणि नक्षलींमधे चकमक सुरू झाली, यात तीन नक्षलींचा मृत्यू झाला. छत्तीसगड राज्यात या वर्षभरात २८४ नक्षली चमकमीकत मारले गेल्याचं सुरक्षा दलानं म्हटलं आहे.

<><><><><>

काँग्रेस नेत्या आणि विधान परिषद सदस्य प्रज्ञा सातव यांनी आज भाजपात प्रवेश केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. भाजपा प्रवेश करण्यापूर्वी प्रज्ञा सातव यांनी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय आणि काँग्रेसचे नेते दिवंगत राजीव सातव यांच्या प्रज्ञा या पत्नी होतं. मराठवाड्यातल्या हिंगोली जिल्ह्यातल्या प्रज्ञा सातव २०२१ मधे पहिल्यांदा विधानपरिषदेवर निवडून गेल्या. सोलापूर जिल्ह्यातले विधानसभेचे माजी आमदार दिलीप माने यांनीही भाजपात प्रवेश केला आहे.

<><><><><>

नाशिक इथं भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात साधुग्राम उभारण्यासाठी तपोवनातल्या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाने १४ जानेवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. नाशिक इथे राहणाऱ्या एका नागरिकाने या संदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर आज उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. तपोवनातली ही झाडं ३० ते ४० वर्षं जुनी असून नाशिकला प्राणवायूचा पुरवठा करतात. त्यामुळे साधुग्रामच्या निर्मितीसाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली असून येत्या १४ जानेवारीपर्यंत वृक्षतोडीला स्थगिती दिली आहे.

<><><><><>

नियमांचं उल्लंघन करणाऱ्या ॲप आधारित खासगी वाहतूक कंपन्याच्या बाईक टॅक्सीबाबत राज्य परिवहन प्राधिकरण निर्णय घेईल, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल दिली. कल्याण इथं एका बाईक टॅक्सी चालकाने महिला प्रवाशाचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. या घटनेच्या पार्श्वभूमीवर काल मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीनंतर सरनाईक बोलत होते.

<><><><><>

उत्तर गोवा नाईटक्लब आग प्रकरणात बर्च बाय रोमिओ लेन नाईटक्लबच्या चार सहमालकांपैकी एक असलेला आरोपी- अजय गुप्तानं म्हापसा न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याला १० डिसेंबर रोजी अटक झाली होती. सहा डिसेंबरच्या मध्यरात्री लागलेल्या या आगीत क्लबचे २० कर्मचारी, पाच पर्यटक मृत्युमुखी पडले. या प्रकरणात आत्तापर्यंत ८ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

<><><><><>

नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या परिसरात बॉम्ब असल्याचा ईमेल आज सकाळी न्यायालयाच्या अधिकृत ईमेल आयडीवर आल्याची माहिती जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी दिली. बॉम्बशोधक आणि निकामी करणारं पथक न्यायालय परिसराची कसून झडती घेत असून अद्याप तरी काही संशयास्पद सापडलं नसल्याचं पोलिसांनी सांगितलं. आरडीएक्स असलेली दोन शक्तिशाली उपकरणं या परिसरात असल्याचं या मेलमधे म्हटलं होतं.

<><><><><>

अमली पदार्थयुक्त गोळ्यांची विक्री केल्या प्रकरणी एफडीए, अर्थात अन्न आणि औषध प्रशासनानं नांदेड जिल्ह्यातल्या १३ औषधांच्या दुकानांचे परवाने रद्द केले असून, ३२ दुकानांचे परवाने निलंबित केले आहेत.  एफडीएनं डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय अमली पदार्थांचा अंश असलेल्या गोळ्यांची विक्री केल्याबद्दल ४८ दुकानांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या दुकानांनी सादर केलेलं स्पष्टीकरण असमाधानकारक आढळून आल्यामुळे ही कारवाई केल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

वर्धा जिल्ह्यात  आर्वी - अमरावती रस्त्यावर काल ट्रकनं सायकलला दिलेल्या धडकेत एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. नववीत शिकणारी ही विद्यार्थिनी आपल्या घराकडून शिकवणी वर्गाला जात असताना तिच्या सायकलला ट्रकने जोराची धडक दिली. यात तिचा जागीच मृत्यू झाला. ट्रकचालकाला अटक झाली असून पुढील तपास सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं आज उत्तर प्रदेशात नोएडा इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते १०० वर्षांचे होते. गुजरातमधल्या स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यासह सुतार यांनी २०० हून अधिक भव्य पुतळे उभारून भारताच्या शिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवून दिली.

**१९ फेब्रुवारी** १९२५ रोजी धुळे जिल्ह्यातल्या गोंडुर या गावात जन्मलेल्या राम सुतार यांनी मुंबईच्या जे जे स्कूल ऑफ आर्ट मध्ये शिक्षण घेतलं. १९५२ ते १९५८ या काळात त्यांनी अजिंठा – वेरूळ इथल्या शिल्पांच्या डागडुजीचं आणि नंतर पंचवार्षिक योजनांचे लाभ सांगणारी लघुशिल्प बनवण्याचं काम सरकारी नोकरीत राहून केलं. राम सुतार यांनी आतापर्यंत संसद भवनाच्या आवारातील अनेक नेत्यांच्या मूर्ती घडवल्या. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक दिग्गजांच्या शिल्पांची त्यांनी निर्मिती केली आहे. फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या ठिकाणीही त्यांनी साकारलेली शिल्प उभी आहेत. शिल्पकलेतल्या योगदानाबद्दल सुतार यांना १९९९ साली पद्मश्री आणि २०१६ साली पद्मभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं आहे. तसंच त्यांना नुकतंच महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

राम सुतार यांनी उभारलेली भव्य शिल्पं ही भारताच्या चिरस्थायी वारशाची महान प्रतीकं म्हणून उभी आहेत, असं **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी समाज माध्यमावरच्या शोकसंदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही सुतार यांना समाज माध्यमाद्वारे आदरांजली वाहिली आहे. सुतार यांनी आपल्या कलाकृतींमधून भारताचा इतिहास, संस्कृती यांना ठसठशीतपणे अभिव्यक्त केल्याचं मोदी म्हणाले.

**शिल्पकला** क्षेत्रावर आपलं आणि महाराष्ट्राचं नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

राम सुतार यांना आदरांजली अर्पण केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही राम सुतार यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**//<><><><><>//**